जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट दिनांक - २६/०९/२०२३

पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-५,पुणे शहर

### परिमंडळ ०५ कार्यक्षेत्रांतील पोलीस स्टेशनकडील वेग-वेगळया गुन्हेगारांवर लावण्यात आलेला मोक्का एमपीडीए व हद्दपारीचे कारवाई बाबत

मा.पोलीस आयुक्त सो.पुणे शहर यांनी पुणे शहरांतील गुन्हेगारी वर्चस्वांकरिता टोळी युध्द करणारे गुन्हेगारांवर ठोस व परिणांमकारक कारवाई करणेचा बडगा उभारला आहे. तसेच पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतील वेगवेगळे पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर गणेशोत्सव सन २०२३ चे कालावधीत प्रतिबंधात्मक कारवाई करणेबाबत आदेश दिलेले होते.

नमूद आदेशांप्रमाणे परिमंडळ-५ कार्यक्षेत्रांतील रेकॉर्डवरील गुन्हेगारांचे अभिलेखाचा अभ्यांस करुन महाराष्ट्र राज्य संघटित गुन्हेगारी अधिनियम, महाराष्ट्र झोपडपट्टी दादा हातभटट्ीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती अधिनियम, महाराष्ट्र पोलीस कायदा (हद्यपार) प्रमाणेची माहे जानेवारी-२०२३ ते आजपावेतो करणेत आलेले कारवाई बाबतची माहिती खालीलप्रमाणे- चालु गणेशोत्सव सन-२०२३ चे धर्तीवर दि.२३/०९/२०२३ रोजी परिमंडळ-०५ चे कार्यक्षेत्रातील शरिराविरुध्दचे गुन्हे करणारे दोन टोळयांना महाराष्ट्र पोलीस कायदा (हद्यपार) क.५५ प्रमाणे हद्यपार करणेत आलेले आहे. त्यामध्ये हडपसर पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रातील कार्यरत टोळीमधील एकूण ०७ गुन्हेगार व बिबवेवाडी पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रातील कार्यरत टोळीमधील एकूण ०२ गुन्हेगारांना हद्यपार करणेत आलेले आहेत.

महाराष्ट्र राज्य संघटित गुन्हेगारी कायदयाप्रमाणे १६ टोळयांवर कारवाई करुन टोळी प्रमुख व त्यांचे सदस्य मिळून एकूण ८८ आरोपींवर कारवाई करणेत आलेली आहे व कारागृहांत जेरबंद केले. तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी दादा हातभटट्ीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती कायदयाप्रमाणे (एमपीडीए) एकूण १२ आरोपींना कारागृहांत जेरबंद केलेले आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा (हद्यपार) क.५५,५६,५७ प्रमाणे पुणे शहर आयुक्तालय,पिंपरी-चिंचवड आयुक्तालय व पुणे जिल्हयांतून असे एकूण ९२ आरोपींना हद्यपार करणेत आलेले आहे. तसेच महाराष्ट्र (मुंबई) दारुबंदी अधिनियम १९४९ प्रमाणे एकूण ६३ आरोपीविरुध्द कारवाई करणेत आलेली आहे. परिमंडळ-५ कार्यक्षेत्रांतील रेकॉर्डवरील एकूण २५५ गुन्हेगारांवर गंभीर गुन्हयाचे अनुषंगाने कारवाई करणेत आलेली आहे. यापुढे देखील अशाप्रकारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्याचे उद्देशाने रेकॉर्डवरील गुन्हेगारांना गुन्हे करण्यापासुन परावृत्त करणेकामी व गुन्हयांना आळा घालण्याचे दृष्टीकोनातुन कारवाई करण्यात येणार आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री. संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०५,श्री.विक्रांत देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनांप्रमाणे मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे,श्री.शाहुराजे साळवे व मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे,श्रीमती.अश्विनी राख यांनी व त्यांचे विभागीय पो. स्टे. कडील प्रभारी अधिकारी व निगराणी पथकांतील अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केलेली आहे.